## ४. समकालीन भारत: शांतता, स्थैर्य आणि राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

**(१) विविधतेत एकता हे महत्त्वपूर्ण भारतीय मूल्य याच्याशी निगडित आहे**
(अ) पंचायती राज
(ब) राष्ट्रीय एकात्मता
**(क) राष्ट्र ही संकल्पना**
(ड) Melting pot ही संकल्पना

**(२) चारू मुजुमदार यांच्याशी निगडित आहेत**
(अ) JKLF
**(ब) नक्षलवादी चळवळ**
(क) हिजबुल मुजाहिद्दीन
(ड) आसाम तेल कोंडी

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) जवाहरलाल नेहरू- Discovery of India
(ii) तमिळ लोकांच्या हक्कांसाठी लढा - LTTE
(iii) राष्ट्रीय एकात्मता परिषद - कलम ३७०
**उत्तरे: दुरुस्त जोड्या-**(१) राष्ट्रीय एकात्मता परिषद - १९६१

**प्र.२ (अ) गटात न बसणारा शब्द ओळखा.**


**दहशतवाद, नक्षलवाद, राष्ट्रवाद, उग्रवाद**
**उत्तरे:** राष्ट्रवाद (अतिरेकी मार्गाचे समर्थन करीत नाही)

**(ब) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**

**(१) समाजात भीती / घबराट / धास्ती निर्माण करण्यासाठी हिंसाचाराचा केलेला वापर -**
**उत्तरे:** दहशतवाद

**(२) लोकांचा राज्याच्या निर्णय प्रक्रियेतील सहभाग -**
**उत्तरे:** सहभागयुक्त लोकशाही

**प्र.३ (अ) संकल्पना चित्र पूर्ण करा.**
**उत्तर:(Rotate your phone)**




**राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये**

**<u>समान नागरिकत्व</u>**
**<u>विविधतेत एकता</u>**
**<u>समानता</u>**
**<u>राष्ट्राप्रती निष्ठा</u>**
**<u>बंधुत्व जोपासणे</u>**
**<u>सामाजिक, राजकीय, आर्थिक न्याय</u>**
**<u>धर्मनिरपेक्षता</u>**

**(ब) खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

**(१) राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी लोकशाही आवश्यक आहे.**
**उत्तर:** वरील विधान बरोबर आहे.
**कारण:** लोकशाहीमुळे राजकीय प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची संधी देशातील सर्व घटकांना मिळते.

**(२) भारतीय स्वातंत्र्य चळवळ राष्ट्रीय एकात्मतेस पोषक ठरली.**
**उत्तर:** वरील विधान बरोबर आहे.

**कारण:** परकीय राजवटीपासून स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी सर्व 'भारतीय' एकत्र आले. ही भावना राष्ट्रीय एकात्मतेस पोषक आहे.

**प्र.४ सहसंबंध स्पष्ट करा.**

**(१) राष्ट्रीय एकता आणि प्रादेशिक अस्मिता.**
**उत्तर:** (१) राष्ट्रीय एकता आणि प्रादेशिक अस्मिता एकमेकांशी विसंगत नाहीत.
(२) भारतासारख्या खंडप्राय आणि विविधतेने नटलेल्या देशात प्रादेशिक अस्मितेचा आदर करूनच राष्ट्रीय एकात्मता साध्य करता येईल.
(३) राष्ट्रीय एकात्मता आणि प्रादेशिक अस्मिता यांच्यात समतोल प्रस्थापित करण्यासाठी भारताने संघराज्यात्मक शासन पद्धतीचा स्वीकार केला.
(४) प्रादेशिक अस्मिता जोपासण्यासाठी राज्यांची भाषावर पुनर्रचना करण्यात आली.
(५) राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात २२ भाषांचा समावेश करण्यात आला. राज्यांना यांपैकी कोणत्याही भाषेत राज्यकारभार करण्याची मुभा देण्यात आली आहे.

**प्र.५ तुमचे मत नोंदवा.**

**शांतता, स्थैर्य यांची राष्ट्राच्या प्रगतीसाठी गरज असते**.
**उत्तर:** राष्ट्राच्या प्रगतीसाठी शांतता व स्थैर्य यांची गरज असते,या विधानाशी मी सहमत आहे.
**कारणे:** (१) कामगार व विदयार्थी वर्गाची आंदोलने, शेतकऱ्यांचे लढे, जातीय दंगली व जातीय हिंसाचारामुळे अराजकसदृश परिस्थिती निर्माण होते.
(२) या समस्या/आंदोलने आटोक्यात आणण्यासाठी शासनाचा वेळ खर्ची पडतो, तसेच आंदोलनांच्या काळात सार्वजनिक मालमत्तेची नासधूस होते.
(३) दुर्मीळ असलेली साधनसंपत्ती अनुत्पादक उपक्रमांवर खर्च करावी लागते. त्यामुळे राष्ट्राच्या प्रगतीत खंड पडतो.
(४) देशाची आर्थिक प्रगती होण्यासाठी सर्व समाजघटकांनी संयम बाळगणे आणि सामंजस्याची भूमिका घेणे गरजेचे आहे. त्यामुळे देशात शांतता व स्थैर्य वाढेल आणि देशाची प्रगती होईल.

**प्र.६ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**(१) भारतातील डाव्यांचा उग्रवाद म्हणजे काय?**
**उत्तर:** (१) नक्षलवादी चळवळ जी माओवादी चळवळ अथवा डाव्यांची उग्रवादी चळवळ म्हणूनही ओळखली जाते.
(२) तिला शेतमजूर, दलित आणि आदिवासी लोकांचे समर्थन आहे. तो चळवळ शहरी भागात विशेषतः कामगार वर्गात पसरली आहे.
(३) जिथे अन्याय, शोषण, दमन आणि राज्याकडून दुर्लक्षिले गेल्याची भावना असते, तेथे ही चळवळ यशस्वी होते.
(४) या चळवळीचा प्रसार बिहार, झारखंड, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश या राज्यांत झाला.
(५) सन २००४ मध्ये वेगवेगळ्या नक्षलवादी गटांनी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) या पक्षाची स्थापना केली.
(६) कार्ल मार्क्स, लेनिन आणि माओ-त्से-तुंग यांच्या वैचारिक बैठकीच्या आधारे कार्य करणारी ही जहाल-उग्रवादी संघटना आहे.सशस्त्र बंडाच्या मार्गाने लोकशाही शासन उलथवून पाडण्यासाठी या संघटना प्रयत्नशील असल्याने त्यांना दहशतवादी संघटना म्हणून घोषित करण्यात आले असून त्यांच्या कारवायांना प्रतिबंध करण्यात आला आहे.

**(२) जम्मू-काश्मीरमधील सीमापार दहशतवाद स्पष्ट करा.**
**उत्तर:** (१) अमानतुल्ला खान यांनी १९६५ साली पाकव्याप्त काश्मीरमध्ये Plebiscite Front हा लष्करी गट स्थापन केला. १९७७ साली त्याचे नामकरण Jammu-Kashmir Liberation Front असे करण्यात आले.
(२) ही दहशतवादी संघटना 'आझादी'साठी हिंसाचाराचा अवलंब करते. या गटास साहाय्य करण्यासाठी

पाकिस्तानने हिजाबूल मुजाहिदीन या संघटनेच्या दहशतवादयांना भारतात पाठवले. त्यातून आझादीचा लढा हा Pan- Islamic लढा बनला.
(३) पाकिस्तानातील IIS ही सरकारी संघटना दहशतवाद्यांना लष्करी रसद व आर्थिक पाठबळ पुरवते. त्यामुळे जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी हिंसाचार वाढला असन राजकीय अस्थैर्य निर्माण झाले आहे.
(४) भारतीय सैन्याद्वारा या सीमापारच्या दहशतवादाला चोख उत्तर दिले जात आहे.